सन २०१२ पूर्वीचे स्वायत्त संस्था (महानगरपालिका/नगरपरिषदा) यांचे प्रलंबित सहाय्यक अनुदान मंजुर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्वसंअ-२०१९/१५१/प्र.क्र.४४/कु.क.

बी विंग, १० मजला, गो.ते.रुग्णालय, संकुल इमारत
लो.टि.मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: ३० मार्च,२०१९

वाचा -

१) **अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे जा.क्र.राकुकका /सहा.अनुदान/कक्ष ५/ सहायक अनुदान मंजुरी/ ३६०९ / २०१९, दि.१४.१.२०१९**

प्रस्तावना -

कुटुंब कल्याण कार्यक्रम हा १००% केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून तो केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व केंद्रिय अर्थ सहाय्याने राबविण्यात येतो. या कार्यक्रमामध्ये स्थानिक संस्थांचा सहभाग असून या संस्थांना मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केंद्र शासनाच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने संबंधित संस्थांमार्फत केली जाते. त्यामुळे सदर कर्मचारी हे राज्य शासनाचे कर्मचारी नाहीत, मात्र या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्यावरील केलेल्या खर्चाची १००% प्रतिपूर्ती कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनामार्फत करण्यात येते. सन २०१२ पूर्वीचे स्वायत्त संस्था (महानगरपालिका/नगरपरिषदा) यांचे प्रलंबित सहाय्यक अनुदान मंजुर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

स्वायत्त संस्था (महानगरपालिका/नगरपरिषदा) या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यावरील खर्च भागविण्यासाठी रु.५,११,०४,६७९/- (रु. पाच कोटी अकरा लाख चार हजार सहाशे एकोणऐंशी फक्त) एवढे प्रलंबित सहाय्यक अनुदान वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सन २०१२ पूर्वीच्या स्वायत्त संस्था (महानगरपालिका/नगरपरिषदा) यांचा प्रलंबित असलेला सहाय्यक अनुदानाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	वर्ष	रक्कम
१	औरंगाबाद मनपा	२००५-२००६ ते २०११-२०१२	रु.३,०४,०७,१६७/-
२	अकोला मनपा	२००१-२००२ ते २०११-२०१२	रु. १,१७,५५,३८३/-
३	चंद्रपूर मनपा	२००९-२०१० ते २०११-२०१२	रु. ३६,८३,७९६/-
४	पुणे मनपा	२०११-२०१२	रु. २६,८३,७९६/-
५	जालना नगरपरिषद	२००७-२००८ ते २०१०-२०११	रु.२५,७४,५३७/-
एकुण (अ)			**रु.५,११,०४,६७९/-**

३. वरील तक्त्यात दर्शविलेली एकुण रक्कम रु.५,११,०४,६७९/- (रु. पाच कोटी अकरा लाख चार हजार सहाशे एकोणऐंशी फक्त) एवढा खर्च मागणी क्र.-आर-१, २२११ कुटुंब कल्याण (०१) (०२) स्थानिक संस्था व इतर संस्थांनी चालविलेल्या नागरी कुटुंब कल्याण केंद्रांना अनुदान (१००% केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम) (२२११ ०१८५) ३६, सहाय्यक अनुदाने (वेतन) या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा.

४. ज्या प्रयोजनासाठी सहाय्यक अनुदान मंजूर केले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे तसेच केलेल्या खर्चाचा १००% प्रतीपूर्तीचा प्रकार केंद्र शासनास विहित वेळेत कळविण्याची दक्षता अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी घ्यावी.

५. सदर सहायक अनुदान मंजूरीसाठी पुढील बाबीच्या अधीन राहुन मंजूरी देण्यात येत आहे.

१. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण, पुणे यांनी वरील रकमांचे देयके तयार करुन संबंधित संस्थेला वितरीत करावे.
२. ज्या ज्या वेळी निरीक्षणासाठी महालेखापाल, महाराष्ट्र राज्य तसेच केंद्र शासन/राज्य शासनाचे प्रतिनिधी येतील त्या त्या वेळी योग्य ती कागदपत्रे संस्थेने सादर करणे बंधनकारक राहील. शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना/कार्यालयांना मंजूर अनुदानासंबंधीचे हिशेब तपासणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.
३. सहायक अनुदान म्हणून मिळणाऱ्या या रकमेचे हिशेब सदरहू संस्थेने त्यांच्या नेहमीच्या इतर कार्यक्रमाहून स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

४. मंजूर नसलेल्या बाबींवरील खर्चाचा समावेश सहायक अनुदानात करण्यात आला आहे असे आढळून आल्यास मंजूर केलेली रक्कम एकरकमी वसुली करण्याचे अधिकार शासनास राहतील.
५. ज्या उद्देशासाठी अनुदान मंजूर केले आहे. त्याच उद्देशासाठी खर्च करण्यात यावे
६. आहरीत करावयाचा निधी PLA अथवा बॅक खात्यात जमा न करता खर्च होणार आहे असे आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रमाणित करावे.

६. यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखा परिक्षण झाले असून त्या संदर्भात लेखा परीक्षण/महालेखापाल यांचे आक्षेप नसल्याचे आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रमाणित करावे.

७. केंद्र शासनाचे दि. २५.५.२०१२ चे आदेशानुसार सन २०१२ पासून पुढील कालावधीसाठी स्वायत्त/ स्वयसेवी संस्थांना सहायक अनुदान अनुज्ञेय राहणार नाही याची दक्षता संबधीत कार्यालय यांनी घ्यावी.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२,दि.१५.०४.२०१५ चे परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग- पहिला, उपविभाग एक मधील अनु क्रमांक ६, नियम ४० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९११५७३२०९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.03.30 18:45:04 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, महाराष्ट्र - ½ (लेखाअनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९. मुख्य प्रशासकिय अधिकारी, अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
१०.वित्त विभाग,(व्यय १३/ अर्थसंकल्प ९), मंत्रालय, मुंबई.
११.सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प /लेखा), मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती.